केसरी
गुरुवार, १९ सप्टेंबर २०१९

# 'विवेकानंद'मध्ये हिंदीदिनी विविध स्पर्धा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

येथील विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवसाचे औचित्य साधून निबंध लेखन, जाहिरात लेखन, वक्तृत्व, स्वरचित हिंदी काव्य पठन या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातील निबंध लेखन स्पर्धा संपन्न झाल्या.

या स्पर्धा विश्वभाषा हिंदी, स्वस्थ/तंदुरूस्त भारत आंदोलन, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक विचार, आजची नारी कितनी स्वतंत्र...?, सैलाब (बाढ) और जल प्रबंधन या विषयावर संपन्न झाल्या. बुधवारी सकाळी स्वरचित हिंदी काव्य पठन स्पर्धा संपन्न होणार आहेत. या कविता स्वरचित असाव्यात.१९ सप्टेंबरला १०.३० वा. वक्तृत्व स्पर्धा - पर्यावरण संवर्धन- एक जिम्मेदारी, आज की भारतीय नारी, भारत की नई राष्ट्रीय शिक्षा निती, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे, वर्तमान काल में गांधीजी के विचारों की प्रासंगिकता या विषयावर होणार आहेत. २१ सप्टेंबर रोजी विजेता प्रथम तीन स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रोख रक्कम, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । गुरुवार, १९ सप्टेंबर २०१९

# 'विवेकांनद'मध्ये व्याख्यान

**कोल्हापूर :** 'इंग्रजी ही भाषा स्पर्धा परीक्षेसाठी खूप महत्त्वाची आहे', असे प्रतिपादन महावीर कॉलेजचे प्रा. हेमंत पाटील यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये इंग्रजी सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. एस. एम. रुईकर होते.

इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रभावती पाटील यांनी प्रास्ताविक केले. कला व वाणिज्य शाखेच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी यांनी ओळख करुन दिली. डॉ. कविता तिवडे यांनी आभार मानले. सृष्टी चाळके हिने सूत्रसंचालन केले. MT

पुण्य नगरी

गुरुवार, १९ सप्टेंबर २०१९

# विवेकानंद–सोसायटी मॅथेमेटिकल इंजि. मध्ये संशोधन करार

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विवेकानंद कॉलेज व सोसायटी फॉर मॅथेमेटिकल इंजिनिअरिंग या दोन्ही संस्थांमध्ये संशोधन करार करण्यात आला. या करारान्वये विद्यार्थ्यांसाठी ट्रेनिंग प्लेसमेंट, डिजिटल लायब्ररी व व्यक्तिमत्त्व विकास इत्यादी गोष्टींवर संयुक्तपणे काम करण्याचे ठरविण्यात आले आहे. या कंराराचा विद्यार्थी वर्गास चांगला लाभ होणार असून विविध गोष्टींचे अद्ययावत ज्ञान मिळण्यास मदत होणार आहे.

या करारप्रसंगी विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, गणित विभाग प्रमुख प्रा. एस. पी. पाटणकर, प्रा. एस. टी. सुतार, प्रा. अविनाश पाटील, प्रा. जी. बी. कोल्हे, अस्मिता पाटील यांच्यासह सोसायटी फॉर मॅथेमेटिकल इंजिनिअरिंगचे प्रमुख जगदीश देसाई, राजेश देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

# युवती, महिलांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथक सदैव तत्पर : मेनकर

'पुढारी' प्रयोग सोशल फाऊंडेशन-विवेकानंद कॉलेजतर्फे मार्गदर्शन सत्र

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजात निर्भयपणे वावरता यावे, यासाठी निर्भया पथक सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन निर्भया पथक प्रमुख पोलिस निरीक्षक अनिता मेनकर यांनी केले. दैनिक 'पुढारी' संचलित प्रयोग सोशल फाऊंडेशन, विवेकानंद कॉलेज व निर्भया पथक (कोल्हापूर) यांच्या वतीने 'निर्भया पथकाची कार्यपद्धती' या विषयावर आयोजित मार्गदर्शन सत्रामध्ये त्या बोलत होत्या.

युवती व महिलांवरील छेडछाडीला आळा बसावा, विद्यार्थिनी कॉलेज कॅम्पसमध्ये निर्भीडपणे वावराव्यात, यासाठी निर्भया पथक हे प्रबोधन व जनजागृती करत असल्याचे सांगून मेनकर यांनी चित्रफितीद्वारे निर्भया पथकाचा उद्देश सांगितला.

मेनकर म्हणाल्या, चित्रपटातील घटना आणि खऱ्या आयुष्यातील वास्तव यामध्ये खुपच तफावत असते. चित्रपटातील सर्वच गोष्टी अनुकरणीय नसतात. असुरक्षिततेची भावना, कमी आत्मविश्वास, आचार विचारांची बंधने, पायाभूत शिक्षणाची कमतरता आदी कारणांमुळे महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. अशावेळी न डगमगता अत्याचाराचा सामना निर्भीडपणे करणे गरजेचे आहे. महिलांशी अश्लील भाषेत बोलणे, शिवीगाळ करणे, अश्लील एसएमएस करणे, अश्लील चित्रफीत किंवा फोटो तयार करणे व इतरांना पाठविणे हे कायद्याने गुन्हा आहे. अशा प्रकारच्या छेडछाडीच्या घटना घडल्यास निर्भया पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन मेनकर यांनी केले.



कोल्हापूर : 'निर्भया पथकाची कार्यपद्धती' विषयावर मार्गदर्शन करताना पोलिस निरीक्षक अनिता मेनकर. समोर उपस्थित विद्यार्थिनी.(छाया : नाज ट्रेनर)

## निर्भया पथकाशी संपर्क साधा

निर्भया पथकाशी १०० अथवा १०९१ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा. तक्रार करणाऱ्या महिला, युवतींची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असे निर्भया पथकाच्या प्रमुखांनी सांगितले. याशिवाय सुरक्षिततेसाठी प्ले स्टोअरवरील 'प्रतिसाद ॲप'चा वापर करावा, असे आवाहनही करण्यात आले.

पुढारी प्रयोग सोशल फाऊंडेशन

कार्यक्रमात निर्भया पथकाचे पोलिस हवालदार किशोर पाटील, महिला पोलिस नाईक सविता पाटील, पोलिस कॉन्स्टेबल अविनाश तारळेकर, सूरज भोपळे, कोमल पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समितीप्रमुख प्रा. एस. डी. शिर्के, प्रा. एस . पी. पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विक्रम रेपे यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन प्रा. राजश्री पाटील यांनी केले.